स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

मानव्य विज्ञान विद्याशाखेअंतर्गत इतिहास विषयाच्या पीएच.डी.
पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाची रूपरेषा.

विषय

“ महानुभाव संप्रदायाचा चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ मराठवाडा ”

*** संशोधक विद्यार्थी ***

श्रीमती खंदाडे ज्योती रमाकांत

M.A.B.Ed. M.Phil.

सहशिक्षक, रेणुकादेवी उच्च माध्यमिक आश्रमशाळा, वसंतनगर(महापूर)

ता.जि.लातूर

मो.9422014403, 9423076263

*** संशोधक मार्गदर्शक ***

प्रा.डॉ.लिगाडे ओ.व्ही.

M.A.M.Phil., Ph.D

इतिहास विभाग प्रमुख

शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव

ता.चाकूर जि.लातूर

मो.नं.9764046640

*** संशोधन केंद्र ***

हुतात्मा पानसरे महाविद्यालय, अर्जापूर ता.बिलोली जि.नांदेड

ऑगस्ट - 2023

*** प्रस्तावना :-**

इतिहास म्हणजे वर्तमान आणि भूतकाळ यांचा कधीच न संपणारा सवांद असतो. भूतकाळाच्या आदर्शामधून आपण मानवी भविष्य सुंदर आणि चांगले करण्याचा प्रयत्न करत असतो. पृथ्वीच्या निर्मिती नंतर मानवी जीवन भटक्या स्वरूपापासून स्थिर अवस्थेत यायला हजारो वर्ष जावे लागले. मानवी जीवनाच्या स्थिर अवस्थेत आल्यानंतर धार्मिक संकल्पना चा उदय झालेला दिसून येतो.

मानवी इतिहासाचा विचार करता या भूतलावरच सर्वात जुना धर्म हा हिंदू धर्म आहे. वैदिक कालखंडा पासून ते इ.स.सहावे शतकापर्यंत याला विरोध झाला नाही. इ.स.पूर्व सहाव्या शतकात भारतात बौद्ध व जैन या दोन धर्माचा उदय झाला. वेगवेगळ्या विचाराचे नवीन पंथ उदयास यायला लागले. हजारो पंथ आपला सिंध्दांत आणि आपले वेगळे विचार मांडू लागले. वेगवेगळ्या विचाराने प्रेरित होणारे त्या पंथाचे अनुयायी निर्माण झाले. वेगवेगळे अनेक पंथ उदयास आले असले तरी हिंदू धर्माचा असणारा वैचारिक साथ कधीच सोडली नाही ?

भारतीय इतिहासात महानुभाव पंथाचा उदय झाला. या पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी आहेत. कृष्ण आणि दत्त या देवतेला मानणारा अनुयायी वर्ग या पंथात आहे. या पंथाचे अनुयायी हे हिंदू धर्माला झुगारून देत नाहीत तसेच विरोध करत नाहीत तर हिंदू धर्मामधे राहून त्यांचे तत्वज्ञान सांगत असतात. त्यांच्या या तत्वज्ञानातून मानवी जीवन कसे सुंदर आणि आनंदी बनवता येईल या साठी ते प्रयत्न करत असतात. तसेच जीवनाचे कल्याण करण्याचा प्रयत्न करत असतात.

महानुभाव पंथाचा प्रभाव खूप प्रमाणात दिसून येतो. महानुभाव पंथातील लोकांनी भारतीय समाज आणि भारतीय साहित्य यात मोलाची भर घातली आहे. मराठी भाषेच्या विकासात सुद्धा त्यांचा मोलाचा वाटा आहे. मराठीतील पहिला ग्रंथ हा माहीमभट्ट यांनी लिहिलेला लीळाचरित्र होय. मराठी भाषेच्या विकासात या पंथाचा मोठा हातभार लागल्याचे दिसून येते. वेगवेगळ्या ठिकाणी त्यांचे योगदान विसरता येत नाही असेच आहे. मराठवाडा परिसरात या पंथाचा झालेला प्रचार आणि प्रसार याचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात येणार आहे.

*** विषय निवडः-**

हजारो वर्षापासून चालत आलेल्या प्रथा आणि परंपरा यांचा सारासार विचार वेगवेगळ्या संशोधकांनी त्यांच्या संशोधनात केला आहे. परंतु त्यांना संपूर्णपणे समाजाचा चेहरा किंवा समाजात असणाऱ्या चालीरीती प्रथा आणि परंपरा यांचा उलगडा करता आला नाही. जैन धर्म व बौद्ध धर्म यांच्या विचारांचा प्रसार आणि प्रचार संपूर्ण जगामध्ये झालेला दिसून येतो. जैन आणि बौद्ध धर्म यांच्यावर अनेक संशोधकांनी संशोधन केले आहे. परंतु महाराष्ट्रामध्ये उदयास आलेल्या अनेक वेगवेगळ्या पंथावर पूर्णपणे संशोधन झालेले दिसून येत नाही. वेगवेगळ्या पंथांनी महाराष्ट्रात आपल्या आचाराच्या व विचाराच्या माध्यमातून आपला ठसा समाजावर उमटविला आहे. त्यात वारकरी पंथ असेल महानुभाव पंथ व इतर पंथ असले तरी यांच्यावर पूर्णअंशाने संशोधन झाल्याचे दिसून येत नाही. मराठवाड्याचा विचार करता हा प्रदेश दुष्काळग्रस्त प्रदेश म्हणून समजला जातो. परंतु या भूप्रदेशामध्ये महानुभव पंथांच्या विचारांचे अनेक अनुयायी दिसून येतात. या अनुयायांच्या माध्यमातून समाजात त्यांचे विचार रूजल्याचे दिसून येते. तसेच महानुभव पंथाच्या

तत्त्वज्ञानामध्ये खऱ्या जीवनाचा अर्थ समजतो. अशी धारणा या पंथांच्या अनुयायांमध्ये दिसून येते. त्यांच्या आचारातून व विचारातून मराठवाड्यातील ग्रामीण तसेच शहरी समाज जीवनामध्ये अमुलाग्र बदल झाल्याचा दिसून येतो. त्यांच्या विचारातून झालेले हे समाज परिवर्तन या प्रस्तुत संशोधनातून जगाच्या समोर यावे अशी संशोधकाची भूमिका असल्यामुळे महानुभावी व्यक्तींची व साहीत्याची कुटुंबाशी जवळीकता असल्यामुळे त्याच्या आकर्षणातून " महानुभाव संप्रदायाचा चिकित्सक अभ्यास: विशेष संदर्भ मराठवाडा " हा विषय निवडलेला आहे.

*** संशोधना व्याप्ती व मर्यादा :-**

भारतात प्राचीन काळापासून वेगवेगळ्या जाती धर्माची लोक गुण्यागोविंदाने राहत आहेत. हिंदू धर्म वैदिक काळात निर्माण झाला जो की सर्वात प्राचीन धर्म म्हणून ओळखला जातो. कालांतराने जगाच्या पाठीवर वेगवेगळे धर्म अस्तित्वात आले. जैन, बौद्ध, शीख, पारशी व मुस्लिम हे धर्म उदयाला आले. हे सर्व धर्म पृथ्वीच्या पाठीवर वेगवेगळ्या ठिकाणी अस्तित्वात असले तरी, या सर्व मुख्य धर्मामध्ये वेगवेगळ्या विचाराला मानणारा वर्ग निर्माण होऊन त्यांचा वेगळा पंथ अस्तित्वात आला, म्हणजेच बौद्ध धर्मामध्ये राहूनच महायान व हीनयान हे पंथ निर्माण झाले. जैन धर्मामध्ये श्वेतांबर व दिगंबर हे दोन पंथ निर्माण झाले. हिंदू धर्मामध्ये तर वेगवेगळ्या अनेक पंथांचा उदय झाला. या पंथाची लोक हे वेगळ्या विचाराचे असली तरी त्यांचे तत्त्वज्ञान वेगळे असले तरी त्यांनी कधीच हिंदू धर्म सोडला नाही. हिंदू धर्मामध्ये राहूनच त्यांनी त्यांच्या पंथाचे तत्त्वज्ञान जगाला सांगण्याचा प्रयत्न केला, त्यामध्ये महाराष्ट्रात वेगवेगळे पंथ हिंदू धर्माच्या

अखत्यारीत उदयास आले. प्रस्तुत संशोधनात महाराष्ट्रामध्ये इसवी सन 12 व्या शतकात उदयास आलेल्या महानुभाव पंथाचा अभ्यास करण्यात येणार आहे. महानुभाव पंथाच्या विचाराचे लोक महाराष्ट्र तसेच संपूर्ण भारतभर पसरलेली आहेत. या प्रस्तुत संशोधनामध्ये महानुभाव पंथाचा व त्यांच्या तत्त्वज्ञानाचा झालेला समाजावरील परिणाम अभ्यासला जाणार आहे. या प्रस्तुत संशोधनामध्ये मराठवाड्यातील आठ जिल्हयाच्या अनुषंगाने महानुभाव पंथाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

*** संशोधनाची उद्दिष्टे (Objectives):**

प्रस्तुत संशोधन विषय निवडण्याचे उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

1.महानुभाव संप्रदायाच्या उदय व विकासाचा अभ्यास करणे.

२.महानुभाव संप्रदायातील चक्रधर स्वामी यांचे योगदान अभ्यासणे.

३.महानुभाव संप्रदायातील पाच अवतार शिष्यगण व विधी यांचा अभ्यास करणे.

४.महानुभाव संप्रदायाचा मराठवडयाशी संबंध व त्याचे योगदान यांचा अभ्यास करणे.

*** संशोधनाची गृहीतके :-**

प्रस्तुत संशोधनात खालील गृहीतके मांडण्यात आलेली आहेत.

१. मराठवाडा महानुभाव पंथाचे केंद्रस्थान होते.

२. मराठवाड्यात महानुभाव पंथाला मानणारा वर्ग अस्तित्वात आहे.

३. महानुभाव तत्वज्ञानाचे सामाजिक जडणघडणीत मोलाचे योगदान असून समाजावर परिणाम झाल आहे.

४. महानुभाव तत्त्वज्ञानामुळे समाज हा समाजशील जीवन जगत आहे.

५. महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान मार्गदर्शक असून जीवनात मोक्ष मिळवून देते.

*** संशोधन पद्धती (Methodology) :-**

सदर विषयाच्या संशोधनासाठी प्राथमिक साधने म्हणून तत्कालीन उपलब्ध अप्रकाशित व प्रकाशित मराठी, हिंदी, इंग्रजी साधनाचा वापर केला जाणार आहे.प्रस्तुत संशोधन कार्यामध्ये महानुभाव पंथाच्या लिखित अलिखित साधनांचा अभ्यास केला जाणार आहे. महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान सांगणाऱ्या तसेच या पंथाच्या अनुयायांच्या जीवनावर लिहिलेली चरित्रे तसेच महानुभाव पंथाचे धर्मग्रंथ माहीमभट्टाचे लीळाचरित्र, इ. साधनांचा वापर करून संशोधन करण्यात येणार आहे. तसेच महानुभाव पंथाच्या अनुयायाकडून प्रश्नावली भरून घेवून संशोधन कार्य करण्यात येणार आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये वृत्तपत्रे, रोजनिशी, आत्मचरित्र प्रकाशित व अप्रकाशित ग्रंथ, धार्मिक ग्रंथ इत्यादी प्राथमिक तसेच दुय्यम साधनाचा वापर करून संशोधन कार्य पूर्ण करण्यात येणार आहे.

*** पूर्व संशोधनाचा आढावा :-**

मराठवाडयातील महानुभाव संप्रदायावर अनेक विद्यापिंठा मध्ये वेगवेगळया विषयावर शोध प्रस्तुत करण्यात आलेले आहेत. अनेक लेखक, संशोधक, विद्यार्थी यांनी महानुभाव संप्रदायाच्या अनुषंगाने चिकित्सक अभ्यास करून आपले लेख व ग्रंथ प्रकाशित केलेले आहेत.

1) ज्यामध्ये डॉ.कोलते वि.भि. यांनी या संप्रदायावर चिकित्सक अभ्यास करून त्यांनी स्थान पोथी, लीळाचरित्र, श्री. गोविंद प्रभू चरित्र, रूक्मिनी-स्वयंवर, शिशुपालवध, ज्ञानप्रबोध, वच्छाहस, सहयाद्री वर्ण्न, श्री चक्रधर चरित्र, महानुभाव संशोधन, महानुभाव तत्वज्ञान, उध्दवगीता, लक्षणबंद, आचार वचनामृत, महानुभवांचा आचार धर्म, विचार वचनामृत इ. साहीत्य प्रकाशीत केलेली आहेत.

2) डॉ.देशपांडे य.खु. यांनी महानुभवांच्या इतिहासाचा मागोवा घेऊन या संप्रदायातील “महानुभावी मराठी वाड्:मय” या विषयावर आपला ग्रंथ प्रस्तुत केलेला आहे.

3) डॉ.देशपांडे ब्रम्हानंद यांनी मराठवाडयातील यादवांची माहीती सांगणारा “ देवगीरीचे यादव ” या ग्रंथ लिहला, तसेच चक्रपाणी महाराजांच्या जीवनावर “ चक्रपाणी – चिंतन ” या ग्रंथाचे लिखाण केलेले आहे.

4) डॉ.पठाण यू.म. यांनी महानुभवांच्या इतिहासांचा व तत्वज्ञानाचा सखोल अभ्यास करून स्मृतीस्थळ, दृष्टांन्तपाठ, ऋध्दिपूर महात्म्य आणि शल्यपर्वे इ. साहीत्यांची निर्मिती केलेली आहे.

5) बा.भो. शास्त्री हे महानुभव संप्रदायातील थोर किर्तनकार असुन त्यांनी आपल्या किर्तनातून व ग्रंथातून या धर्माचा प्रसार महाराष्ट्रभर केलेला दिसुन येतो. त्यांनी लिहलेल्या वचनमाला भाग एक महावार्क्य वचनमाला भाग दोन आणि झोळी या ग्रंथातून महानुभव धर्मातील तत्वज्ञावर चर्चा केलेली आहे.

6) महानुभव धर्मांचे गाढे अभ्यासक, व ज्ञानीपुरूष म्हणून या पंथात यांचे नाव घेतले जाते ते म्हणजे कोळपकर मुरलीधर म्हणून यांनी “उपदेश” “राजविदया”, “महानुभवांचा इतिहास” अशा ग्रंथाची रचना केलेली आहे.

7) खामणीकर हंसराज यांनी आपल्या “महानुभाव तीर्थ स्थाने” या ग्रंथातून महाराष्ट्रातील सर्व स्थांनाची सविस्तर माहीती दिलेली आहे. ज्यामुळे अनेकांना माहीत नसलेल्या स्थांनाना जाने सोपे झाले. स्थान म्हणजे महानुभवांची देवस्थाने होय व त्यांच्या “सर्वज्ञ” या ग्रंथातून त्यांनी श्री चक्रधर स्वामींच्या जीवनावर आधारीत हा ग्रंथ लिहिला आहे. त्यांचे विचार यातून मांडले आहेत.

8) तोंडोळीकर भाऊसाहेब यांनी महानुभांनी दैनिक उपासना कसी करावी. दररोजचा नित्यक्रम कसा असावा यावर त्यांनी “दैनिक उपासना” हा ग्रंथ लिहला व दुसरा “दोन शहामुणी” हा ग्रंथ रचला आहे.

9) श्री गायकवाड बा.ब. यांनी महानुभव धर्मांचे संस्थापक श्री चक्रधर स्वामींवर त्यांनी त्यांच्या तत्वप्रणालीवर “सर्वज्ञ” हा ग्रंथ रचला आहे आणि दुसरा त्यांच्या तत्वज्ञाना वरील ग्रंथ म्हणजे सार्थसुत्रपाठ हा होय.

10) पंजाबी माधवराव यांनी त्यांच्या “हेतुस्थळ” या ग्रंथातून महानुभांचे अचार-विचार कसे असायला पाहिजेत हे सांगीतले तसेच सार्थ नव प्रकरणातून त्यांनी महानुभांचा तत्वप्रणाली वर चिंतन केलेले आहे.

महानुभाव संप्रदायाच्या अनुषंगाने जरी वरील साहित्य प्रकाशित झाले असले किंवा संशोधन झाले असले तरी मराठवाडयातील महानुभाव संप्रदाय हा विषय केंद्रस्थानी ठेवून संशोधन झालेले आढळून येत नाही.

*** संशोधनाचा आराखडा (Tentativechapterization) :-**

सदर शोध प्रबंधाची विभागणी खालील प्रकरनामध्ये करण्यात येईल.

*** प्रकरण योजना :-**

1) महानुभव संप्रदाय उदय आणि विकास :-

हिंदु धर्मात अनेक तत्त्वाचे निरनिराळे धर्मपंथ आहेत. त्यापैकी महानुभाव पंथ हा एक होय. कलयुगातील शालीवाहन शकाच्या बाराव्या शतकात शके 1186 मध्ये महाराष्ट्र राज्यात महानुभाव पंथाची स्थापना झाली. या नव्याने स्थापना झालेल्या महानुभाव पंथाचा उगम अर्वाचीन काळातील नसुन तो प्राचीन काळापासून आहे. महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान काही बाबतीत निराळे असले तरी ते अखेर वेदांतील विचारां पासुनच उत्क्रांत झाले आहे. श्रीमद भगवदगीतेत श्रीकृष्ण म्हणतात. “ ब्रम्हणास्तेन देवश्चं यज्ञाश्च विहिता पूरा ” अर्थात सृष्टी आरंभी ब्राम्हण आणि वेद मी निर्माण केले. हे चार वेद देवतांचे असल्या बद्दल श्रीकृष्ण म्हणतात. या संप्रदायाचे मूळ नाव परमार्ग असे होते. पुढे यासच महात्मा पंथ, महानुभाव पंथ, जयकृष्ण पंथ,

अच्युत पंथ इ. नावे प्राप्त झाली. या प्रकरणात महानुभाव संप्रदायाच्या उदय आणि विकासावर सविस्तर मांडणी करण्यात येणार आहे.

2) चक्रधर स्वामी व महानुभाव संप्रदाय :-

कलयुगातील झालेला उभयदर्शी अवतार होय. हा अवतार गुजरात देशाच्या राजघराण्यात झाला आणि त्यांनी महाराष्ट्रात येवून महानुभाव पंथाची स्थापना केली. गुजरात देशात भडोज शहरी आठशे वर्षा पुर्वी मल्लदेव नावाचा राजा राज्य करीत होता. या मल्लदेवाच्या पोटी पुत्रसंतान नसल्यामुळे त्यांने खंबायत येथील शंखराजाच्या पुत्र श्रीसिंह यास दत्तक घेतले. हा दत्तक पुत्र वयाने लहान असल्यामुळे मल्लदेवाने आपल्या अंत समयी विशालदेव यांच्याकडे राज्याची सर्व सुत्रे सुपूर्त करून आपली इहलोकीची यात्रा संपविली विशाळदेवांना पुत्रसंतती नव्हती म्हणून त्यांनी दत्तात्रेय प्रभूंची भक्ती केली. श्री. दत्तत्रेय प्रभूमुळे माल्हणदेवी पासून शके 1117 मध्ये पुत्ररत्न झाले. त्याचे नाव हरीपाळदेव असे ठेवले. हरिपाळदेव भडोज येथे बारा वर्ष व सहा महिने राहीले म्हणजे शके 1142 ते 1154 पर्यंत होते. शके 1155 मध्ये महाराष्ट्रातील रिध्दापूर येथे गोविंद प्रभूकडून नामांतर झाले. त्यांनी “ श्री चक्रधर ” हे नाव ठेवले. व महानुभावाच्या तत्त्वांचा प्रचार करत सर्व महाराष्ट्र भर त्यांनी भ्रमण केले. व लोकां मध्ये या धर्मांची तत्व रूजवीली. या प्रकरणामध्ये महानुभाव पंथातील चक्रधर स्वामी यांच्या योगदानाचा आढावा घेण्यात येणार आहे.

3) महानुभाव संप्रदायातील पाच अवतार व शिष्यगण :-

हा संप्रदाय ईश्वराच्या पाच अवतारांना मानत आहे. त्यांनी जे तत्त्वज्ञान मांडले आहे ते या पाच अवतारा भोवतीच आहे. प्रत्येक युगात परमेश्वर अवतार

घेऊन तेथील मानव जातीला जो संदेश देत आला आहे. त्या संदेशाचा सार म्हणजेच महानुभाव संप्रदाय होय. या अवतारांनी जे काही तत्वज्ञान लोकांना सांगितले आहेत. त्यातुनच या पंथाच्या साहीत्याची निर्मिती झाली आहे. हाच या पंथाचा सार आहे. श्री. दत्तात्रेय प्रभू, श्रीकृष्ण चक्रवर्ती, श्री. चक्रपाणी महाराज, श्री. गोविंद प्रभू, श्री. चक्रधर स्वामी असे ते पाच अवतार होय. प्रत्येक अवतारांने त्या-त्या युगामध्ये मानव जातीला जो शांततेचा संदेश दिला आहे. व त्या त्या अवतारांच्या काळातील त्यांचा जो शिष्य परीवार झाला त्यांनी पण या संप्रदायातील तत्त्वज्ञानावर फार मोठे साहित्य लिहलेली आहेत.

उदा: महिमभट्टाने लिळा चरित्र ग्रंथ लिहीला. मराठी भाषेतील पहिली कवयत्री महादंबा हि याच पंथातील आहे. प्रस्तुत प्रकरणात महानुभाव पंथातील पाच अवतार व शिष्यगण याच्या अनुषंगाने सविस्तर मांडणी करण्यात येणार आहे.

4) महानुभाव संप्रदायांतील विधी :-

महानुभाव संप्रदायामध्ये वेगवेगळया विधींना फार महत्त्व दिलेले आहे. त्या विधी नुसारच पंथीयांचे कार्य हे चालत असते.जसे पंथ प्रवेश विधी, दैनिक विधी, गुरू दिक्षा विधी, पवित पर्व-गुरूपूजन, दंडवत प्रमाण विधी, प्रेतसंस्कार विधी, दशक्रिया विधी आशा प्रकारे अनेक विधी या करण्यात येतात. प्रत्येक विधीला पंथा मध्ये अनन्य साधारण अस महत्त्व आहे. कारण प्रत्येक विधी करतांना त्या शास्त्रा नुसारच केले जातात. त्या पाठीमागे शास्त्रीय गुढ लपलेले आहे. म्हणून या विधींना या संप्रदायात अनन्य साधारण महत्त्व आहे. या प्रकरणात महानुभाव संप्रदायातील विधीचे स्वरूप व महत्त्व या अनुषंगाने सविस्तर मांडणी करण्यात येणार आहे.

5) मराठवाडयातील महानुभाव संप्रदाय :-

महानुभाव संप्रदायाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामींनी महाराष्ट्रात आपल्या तत्वांचा प्रचार करत जेथे जेथे फिरले आहेत. तेथे तेथे या संप्रदायांच्या मठ, मंदीरांची निर्मिती झाली आहे. काही काळ एकटेच भ्रमण करत होते. नंतर हळु हळु त्यांना त्यांची शिष्य परिवार मिळत गेला. तरी त्यांनी कधीच एका ठिकाणी वास्तव्य केले नाही. आपल्या शिष्य परिवारांला सोबत घेऊनच त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र भर भटकंती केलेली आहे. त्यामध्ये अनेक जिल्हे येतात. उदा.बीड, औरंगाबाद, उस्मानाबाद, जालना, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर इ. या जिल्हयांमध्ये महानुभवीय तत्वज्ञानाचा प्रचार हा मोठया प्रमाणात झालेला आहे. अनेक लोक या धर्मांचे अनुयायी बनलेले आहेत ते तत्वज्ञान स्विकारून समाजात सामाजिक ऐक्य, बांधीलकी रूजवताना दिसतात. मानव जातीला शांतीचा संदेश देत आहेत. आणि आत्म कल्याणावर भर दिला जात आहे. संशोधन कार्यातील हे प्रकरण महत्त्वाचे असून महानुभाव संप्रदायाचे मराठवाडयाशी निगडीत असलेले योगदान सविस्तर मांडण्यात येणार आहे.

6) निष्कर्ष व शिफारशी :-

वरील पाच प्रकरणाचा अभ्यास करून येणारे निष्कर्ष या प्रकरणात मांडण्यात येणार आहेत. तसेच या निष्कर्षाशी निगडीत असलेल्या शिफारसी ही याच प्रकरणात शेवटी करण्यात येणार आहेत.

*** संदर्भ सुचि :-**

1) डॉ.कोलते वि.भि. 1989 “लीळा चरित्र” प्रथम आवृत्ती पुणे, महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ.

2) अराध्य मुरलीधर शास्त्री, 1990 “श्रीमद्भगवदगीता : रहस्थार्थ चंद्रीका”, आवृत्ती तिसरी, भुसावळ, आराध्य प्रकाशन.

3) डॉ.कोलते वि.भि.1962 “महानुभाव संशोधन”, खंड पहिला, मलकापूर, अरूण प्रकाशन.

4) डॉ.देशपांडे य.खु.1960, “महानुभावी मराठी वाड्:मय” दुसरी आवृत्ती पुणे, व्हिनस प्रकाशन.

5) डॉ.बीडकर बाबासाहेब, 2002 “आउसा की आत्मकथा” प्रथम आवृत्ती, मेरठ, प्रभु-प्रसाद प्रकाशन.

संशोधनन कार्य करताना वापरण्यात येणाऱ्या सर्व संदर्भ साधनांचा समावेश शोधप्रबंधाच्या संदर्भसुचीमध्ये करण्यात येणार आहे.

*** परिशिष्टे :-**

संशोधन करताना वापरलेली प्रश्नावली, घेतलेल्या मुलाखती, फोटो, हस्तलिखिते इत्यादी घटकांचा समावेश शोधप्रबंधाच्या शेवटी परिशिष्टामध्ये करण्यात येणार आहे.

संशोधक
श्रीमती खंदाडे ज्योती रमाकांत

मार्गदर्शक
प्रा.डॉ.लिगाडे ओ.व्ही.